# प्रकरण दुसरे

# जोतिराव फुल्यांची काव्यसंपदा

## प्रकरण २ रे

### : जोतिराव फुलेंची काव्यसंपदा

एकोणिसाव्या शतकातील मराठी काव्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर प्रामुख्याने तीन काव्यप्रवाह पहावयास मिळतात. पहिला पंडितीकाव्याचा प्रवाह, दुसरा इंग्रजी वाङ्:मयाच्या प्रभावाने निर्माण झालेला रूपांतरित स्वरूपाचा काव्यप्रवाह आणि तिसरा स्वतंत्रपणे लेखन करणाऱ्या कवींचा काव्यप्रवाह. यातून तत्कालीन जनतेच्या जीवनाशी समरस होणारे लोककवी उदयास आले. या लोककवींवर प्रामुख्याने शाहिरीवाङ्:मयाचा प्रभाव पडलेला होता. शिवकालीन आणि पेशवेकालीन घडमोडीचे वीरश्रीपूर्ण वर्णन करणारे शाळीग्राम, शितूत, प्रभाकर, रावसाहेब गुप्ते यासारख्या शाहिरीकवींच्या प्रेरणेने लोककवींना वेगळेच धैर्य आणि स्फूर्ती मिळाली. स्वतंत्र काव्यरचना करणाऱ्या या लोककवीमध्ये 'भास्कर दामोदर पाळंदे,' 'रणछोडदास, कीर्तिकर,' विष्णू भिकाजी गोखले [विष्णू बुवा ब्रह्मचारी], पद्यमालाकार, विष्णूशास्त्री पंडित, विनायक यशवंत बेरडे यांचा समावेश होतो. लोकहितासाठी पद्यरचना करणाऱ्या या लोककवींच्या काव्यरचनेत कल्पनेच्या भराऱ्या अथवा पोकळ तरंग नाहीत. त्यांच्या काव्यातून कुणाचा पोकळ गोडवा गायला नाही अथवा कुठल्या पारितोषिक प्रलोभनास त्यांचे काव्य बळी पडलेले नाही. तर समाजातील जातीयता, गुलामगिरी, सहगमन, केशवपन, विधवांची कुचंबना, बाला-जरठ विवाह, विवाह-विधीचे स्तोम, भ्रूणहत्या इत्यादी अनेक जाचक रूढीपरंपरेविरुध्द बंड निर्माण करणारी ही लोककवींची कविता होती. यातून जोतिराव फुले सारखे समाजप्रबोधनवादी लोककवी बेडरपणे परखड काव्यरचना करू लागले. त्यांनी शूद्रबांधवांच्या उध्दारासाठी सभा-व्याख्याने देऊन उच्चवर्णीयांचा रोष पत्करून स्वत:ची वाणी शिणवली आणि त्याबरोबरच लेखणीही झिजवली.

जोतिराव फुलेंची कविताही लोकहितार्थ जन्मलेली होती. त्यांच्या काव्यावर तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थितीचा प्रकर्षाने प्रभाव पडलेला

२

होता. त्यांच्या काव्याचे स्वरूप जाणण्यासाठी मराठी काव्यपरंपरेकडे दृष्टिक्षेप टाकावा लागतो.

जोतिरावांच्या काव्याचे स्वरूप :

मराठी काव्याच्या स्वरूपात कालपरत्वे बदल घडत होता. प्राचीन काळी परमार्थ, ज्ञान-भक्ती, वैराग्य यांची शिकवण देणारे आणि भक्तीचाच उत्स्फूर्त अविष्कार करणारे संतकाव्य बहरास आले. कालपरत्वे भागवतादि ग्रंथावर आधारित प्रदीर्घ कथाकाव्य निर्माण झाले. सतराव्या शतकात तर मुक्तेश्वर, वामनपंडितादि पंडितकवींनी पंडितीकाव्यात मोलाची भर घातली. पुढे शाहिरीकाव्य, इंग्रजीरूपांतरीत काव्य, लोककवींची परंपरा, आधुनिक काव्य याप्रमाणे काव्याचे स्वरूप बदलत गेले. जोतिराव फुले मात्र लोककवींच्या परंपरेत मोडतात. त्यांच्या काव्यरचनेचा कालखंड साधारणपणे १८६९ ते १८८० पर्यंत मानला जातो. रा.श्री.जोगांच्या मते जोतिरावांचे काव्य क्रांतिपूर्व कालखंडात समाविष्ट होते. कारण १८४० ते १८८५ हा त्यांच्या मते काव्याचा क्रांतिपूर्व काल होय. या कालखंडातील काव्यरचनेमुळे समाजात नवक्रांतीच्या पूर्वतयारीची बिजे रूजली गेली व समाजप्रबोधन होण्यास सुरूवात झाली.

समाजातील शुद्रातिशुद्रांचे दु:ख, दैन्य, दास्य व दारिद्र्य पाहून जोतिरावांचे अंत:करण कळवळत होते. अंत:करणातील या कळवळयाचा शाब्दिक अविष्कार म्हणजे फुल्यांची कविता होय. हजारो वर्षे चालत आलेल्या जाचक रूढी परंपरांना फुल्यांनी तिलांजली देण्याचे ठरविले. मानवी स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी जोतिरावांनी काव्याच्या माध्यमातून ब्राह्मण्य आणि रूढी-प्रामाण्यावर प्रखर हल्ला चढविला. सबब तत्कालीन कर्मठ सनातन्यांनी हेतुपूरस्सर त्यांची काव्यरचना तशीच दाबून टाकण्याचा प्रयत्न केला असावा, म्हणूनच जोतिरावांची काव्यरचना जवळजवळ शंभरटक्के उपेक्षितच राहिली. पण -

+ "It is enough for a poet, to be guilty conscious of his times."

३

केला जरी पोत बळेचि खाले ।
ज्वाला तरी ते वरती उफाळे ।।

या वामनपंडिताच्या उक्तीप्रमाणे जोतिरावांचे काव्य आणि त्यामागील प्रेरणा दबून राहिली नाही. सत्यशोधक चळवळ, दलितमुक्ती चळवळ, स्त्रीमुक्ती आंदोलन हेच त्यांच्या उफाळलेल्या काव्यज्वालांचे विषय होत. हजारो वर्षे चालत आलेल्या बाधक रूढी-परंपरा जोतिरावांना मोडून काढावयाची होती. यासाठी त्यांनी गद्यलेखनाबरोबर पद्याचाही अवलंब केला. जोतिरावांनी तुकारामादि संतांच्या धरतीची अभंगरचना, अखंड, आरत्या, शाहिरीवाङ्मयासारखे पोवाडे, ब्राह्मणांचे "कसब" हा पद्यग्रंथ व काही मंगलाष्टके इत्यादी काव्यरचना केली.

## काव्यप्रेरणा व हेतू

जोतिराव फुल्यांनी तारुण्यात छ. शिवाजी, वॉशिंग्टनादि वीरपुरुषांची चरित्रे अभ्यासली होती. देशातील सर्वसामान्य देशबांधवांची पिळवणूक-अन्याय पाहून या अन्यायाविरुध्दाच्या आत्मसाक्षात्काराने जोतिरावांचे मन भारावून गेले. याच दरम्यान " थॉमस पेन " या बंडखोर ग्रंथकाराचा "राईटस ऑफ मॅन" हा विचारप्रवर्तक ग्रंथ अभ्यासिला. या ग्रंथातूनच समाजप्रबोधन व देशबांधवांच्या उध्दाराचा साक्षात्कार ऐन तारुण्यात जोतिरावांना झाला. त्यांनी आपली आंतरिक तळमळ वाणी व लेखणीतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.

ज्ञानोबा-पासून तुकोबापर्यंतच्या सर्व संत-कवींनी सामान्यजनांच्या आध्यात्मिक उद्धारासाठी अभंगादि काव्यांचा वापर केला होता. सामान्य जनतेवर या काव्याचा चांगलाच प्रभाव पडला होता. जोतिरावांनी संतलोकांचे हे तंत्र जाणले होते. सुसंस्कारासाठी आवश्यक भाग काव्यातून सांगता येतो. ही परंपरा होती. तुकारामदि संतांच्या अभंगरचनेस असंख्य लोक भारावून गेले होते. कीर्तनादि माध्यमाचा अवलंब करून संतानी आपला उद्देश साधला होता.

आंतरिक तळमळीच्या प्रकटीकरणासाठी अभंगासारखी रचना अधिक प्रभावी ठरु शकेल याची खात्री जोतिरावांना झाली. जोतिरावांच्या अनुयायांनी " सत्यशोधक जलसा " च्या रूपाने संतांची कीर्तन - भजनादि परंपरा टिकवून ठेवली. अर्थातच जोतिराव व त्यांच्या अनुयायांवर तुकारामदि संतांच्या काव्यांचा चांगलाच प्रभाव पडला होता. समाजातील दंभावर व भोंदूगिरीवर तुकारामांनी सडेतोड टीका केली. तशाचप्रकारची शब्दफेक करण्याचे जोतिरावांनी ठरविले. संतांच्या काव्यरचनेचे अनुकरण जोतिरावांनी केले असले तरी फुलेंच्या काव्यांचा उद्देश वेगळा होता. ज्ञानेश्वरापासून नामदेव, एकनाथ, तुकारामादि पर्यंतच्या संतानी अखंड ३०० वर्षे बहुजन समाजात धर्म सोपा करुन पोहोचविण्याचे व टिकविण्याचे कार्य केले.[१] पण जोतिरावांनी " सार्वजनिक सत्यधर्माच्या " रूपाने धर्माचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. संतांनी स्वधर्माचरणावर भर दिला व पारमार्थिक समतेचा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जाती-व्यवस्था ईश्वरनिर्मित आहे व ती अतिप्राचीन काळापासून परंपरागत चालत आलेली आहे. त्यामध्ये बदल करणे गैर असून समाजात विनाकारण असंतोष माजविण्या-सारखे आहे, असा या संतांनी विचार केला असावा. जातीय व्यवस्थेबाबत डॉ. राधाकृष्णन म्हणतात -

" जातीय व्यवस्था ही लोकांना एकत्र आणण्यासाठी व आपल्या धर्माशी इतरांचे सहकार्य मिळवण्यासाठी संस्कृतिसंगमाद्वारा केलेला महानप्रयत्न आहे " परंतु जोतिरावांनी समाजातील जातीय व्यवस्थेचे दुष्परिणाम व शुद्रातिशुद्रांवरील अन्याय पाहून वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेस सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. यासाठी जनजागृतीची गरज होती. संतांनी समाजातील पारमार्थिक समता व आध्यात्मिक उद्धारासाठी अभंगादि काव्याचा अवलंब केला. जोतिरावांनी समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्वासाठी आखंडादि काव्यरचनेचा अवलंब केला. एकोणिसाव्या शतकात समाजप्रबोधन करणा-या जोतिरावांच्या आखंडादि काव्यरचनेचा चांगलाच प्रभाव पडला. दरम्यानच्या सव्वाशे वर्षांच्या कालखंडातील प्रदीर्घ कथाकाव्य व पंडितीकाव्याचा प्रवाह जोतिरावांच्या दृष्टिने समाजप्रबोधनास सार्थ नव्हता. त्याचा उद्देश व स्वरूप वेगळे होते.

प्रदीर्घ कथाकाव्य हे समाजातील साध्याभोळ्या लोकांचे मनोरंजन व त्यांना धर्मशिक्षण देण्याच्या उद्देशातून उदयास आले.[२] सर्वसामान्यांना धर्मतत्वाशी चिकटून ठेवण्याचे कार्य श्रीधर, गिरिधरस्वामी, कवी आत्माराम कृष्णदयार्णवादि कथाकवींनी केले. श्रीधरांनी हरिविजयापासून ते शिवलीलामृता-पर्यंत विविध ग्रंथ शिवाय काही स्फूट कविता पदे लिहिली. कृष्णदयार्णवांनी हरिवरदा, गीतासार सारखे काव्यग्रंथ लिहिले. पंडितकवींनी मात्र आपल्या काव्यात पांडित्य व रसाविष्कारास स्थान दिले. संस्कृतमधील कविसंकेताचाही मुक्तहस्ताने वापर पंडितकवींनी केला. आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करण्यासाठी वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, विठ्ठल बिडकर, निरजंन माधव, मोरोपंता-सारख्या पंडितकवींनी रामायण, महाभारत, भागवत यातील कथाभाग निवडून आपले पांडित्यप्रचूर काव्य सजविले. जोतिरावांच्या दृष्टीने हे सर्व काव्य समाजप्रबोधनास मारकच होय. पण याच दरम्यान निर्माण झालेल्या वीरश्रीपूर्ण शाहिरीवाङ्:मयाने जोतिरावांचे मन वेधून घेतले. त्यांच्या जनजागृतीच्या मोहिमे-साठी या काव्यप्रकाराचाही उपयोग झाला. शिवकालीन व पेशवेकालातील काही पोवाडे, बखरीतील वर्णने वीरश्रीयुक्त व स्तुतीपूर्ण ही होती. शिवकालीन घडमोडीवर यमाजीसारखे शाहीर साध्या पण वीरश्रीपूर्ण भाषाशैलीत पोवाडा तयार करीत होते. प्रभाकर, शाळिग्राम, शितुत, रावसाहेब गुप्त सारख्या शाहिरांनी विपूल पोवाडे लिहिले. पेशवाईतच होनाजीबाळा, सगनभाऊ, परशराम, अनंदफंदी, रामजोशी सारख्यांनी शृंगारिक व काही उपदेशपर लावण्या लिहिल्या. पेशवाईचा शेवट अर्थातच लावणीवाङ्:मयाचा शेवट ठरु लागला. जोतिरावांनी लावणीवाङ्:मय ही तितकेसे रूचले नाही. त्यांच्या प्रतिभेने लावणीवाङ्:मय, पंडितकाव्य, प्रदिर्घ कथाकाव्य या सर्व प्रवाहांना ओलांडून सतराव्या शतकातील तुकारामादि संतांच्या अभंगरचनेकडे व शाहिरी-वाङ्:मयाकडे ही झेप घेतली. अभंग आणि पोवाडयाची रचना गद्यप्राय, खेडवळ व सर्वसामान्यांना सहज समजण्यासारखी साधी, सोपी होती. या काव्यरचनेचे जोतिराव प्रभावित झाले. त्यांना आपले काव्य सर्वसामान्यांपर्यंत पाहोचवायचे होते.

जोतिरावांचे समकालिन कवी व विचारवंत म.मो.कुंटे आणि बजाबा रामचंद्र प्रधान यांनी इंग्रजी पध्दतीची वीररसपूर्ण कविता लिहिली. कुंटेनी राजा शिवाजींच्या रूपाने इंग्रजी साहित्यातील "Heroic Epic" म्हणजे विरसप्रधान काव्य मराठीत नव्याने निर्माण केले. त्यांनी "राजा शिवाजी" हे काव्य सहा विभाग पाडून पूर्ण केले. जोतिराव फुल्यांनीही इ.स. १८६९ मध्ये छत्रपती शिवाजीराजे भोसलेंचा पोवाडा लिहून काव्यनिर्मितीचा शुभारंभ केला. म्हणूनच ग.बा.सरदार म्हणतात, " अर्वाचीन मराठी साहित्यात छत्रपतींचे पराक्रम व कर्तृत्व याकडे प्रथम लोकांचे लक्ष वेधण्याचे श्रेय जोतिरावांच्या पोवाडयाला व "कुंटे" यांच्या "राजा शिवाजी" या काव्यग्रंथांना दिले पाहिजे."[३]

छ. शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा -

"पोवाडा" हा एक जुना काव्यप्रकार आहे. पोवाडयांची निर्मिती चौदाव्या शतकात गोंधळगीतातून झाली.असावी.[४] कालपरत्वे पोवाडयाचे स्वरूप बदलत गेले. पोवाडे रचणारे शाहीर मराठेच असल्याने त्यांची रचना गद्यप्राय-खेडवळ सामान्यांना सहज समजण्यासारखी होती. शिवकाल व पेशवाईमध्ये या काव्यप्रकारास चांगलाच बहर आला होता. पण पेशवाईचा अंत झाला आणि शाहिरीकाव्य हळूहळू नाश पावले. पोवाडयांचा दर्जा घसरला पण जोतिरावां-सारख्या आंग्लाईतील समाजसुधारकांना पोवाडा हा काव्यप्रकार जनजागृतीसाठी प्रभावी वाटला. त्यांनी १८६९ मध्ये मुंबई येथे छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा लिहिला. फुल्यांनी शिवचरित्रातील बहुतेक सर्व महत्वाचे प्रसंग सहजपणे व सरळ प्रवाही भाषेत चितारले आहेत. हा पोवाडा अतिजुनाट व मेसर्स ग्रॅन्ट डफ, मरी वगैरे इंग्रजी लोकांच्या लेखी आधारावरून तयार केला.[५] त्यांनी हा पोवाडा अव्वल इंग्रजीतील एक क्रियाशिल समाजसुधारक व परमहंससभेचे अध्यक्ष 'रामचंद्र बाळकृष्णाजी' यांना अर्पण केला आहे.[६]

जोतिरावांनी या पोवाडयाचे आठ भागात विभाजन केले आहे. विषयांतर न होण्याबाबत कटाक्षाने दखल घेतली आहे. फुल्यांनी हा पोवाडा लिहिताना माळी कुणब्यास समजणाऱ्या सोप्या भाषेत शिवचरित्र सांगण्याची जणू प्रतिज्ञाच केली आहे. पोवाडयास दिलेले शीर्षक ही वैशिष्टयपूर्ण वाटते.

" छत्रपती शिवाजीराजे भोसले " असे पोवाडयाचे शीर्षक आहे. यामध्ये "छत्रपती" हे बिरुद आहेच शिवाय "शिवाजीराजे भोसले" हे कुलनामही समाविष्ट केले आहे.

जोतिराव फुले पोवाडयाच्या सुरुवातीलाच शिवचरित्राचे मुख्य रहस्य व्यक्त करताना म्हणतात -

कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।।
छत्रपती शिवाजीचा ।। [७]

"कुळवाडी भूषण" या पहिल्याच शब्दातून शिवकार्याचे रहस्य स्पष्ट केले आहे. छत्रपती शिवाजी राजे हे शूद्रातिशूद्र कुळवाडीचे भूषण आहे, असे मत 'प्रभाकर वैद्य' आणि 'जयसिंग पवार' यांनी मांडले. पण 'ग. बा. सरदार' "कुळवाडी भूषण" या शब्दाचा वेगळाच अर्थ लावतात. 'कुळवाडी भूषण' शेतजमीन कसणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी आहे, कष्टकरी कुळवाडयाचा शाहीर आहे. सरदारांचे हे मत सार्थ वाटते. जोतिरावांनी संपूर्ण पोवाडयात गो-ब्राह्मण प्रतिपालक हिंदूपद पातशाहीचे संस्थापक इत्यादी तथाकथित शिवाजीराजेंची बिरुदे कुठेही समाविष्ट केलेली नाहीत.

पोवाडयाचा आशय -

जोतिराव फुले पोवाडयाचा उद्देश सांगताना म्हणतात, " हा पोवाडा कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षत्रियांच्या उपयोगी पडावा असा माझा हेतू आहे. " पोवाडयाच्या पहिल्या विभागात शिवाजीराजेंचे बालपण व स्वसौंदर्याचे वर्णन केले आहे. त्यांच्या शुभ्र दातांना मोत्यांच्या लडीची उपमा देतात, नेत्र मृगनयनास लाजवणारे वाटतात. हा सर्वांग सुंदर "बालशिवराय" जिजाबाईच्या मायेच्या पंखाखाली वाढू लागला. राजमातेने बाल शिवाजीस ज्ञानाचे डोस पाजण्यास सुरुवात

केली होती. शिवाजीराजेंच्या घराण्यात निदान दोन पिढयात तरी राजकरण खेळले जात असल्याने शिवाजीच्या बालमनावर राजकीय घडामोडींचा चांगलाच प्रभाव पडला.

दुस-या विभागात जोतिरावांनी राजमाता जिजाबाईंच्या तोंडून अन्यदेशीच्या ब्राह्मण ढंगेखोरांनी केलेला छळवाद शिवाजीस ऐकविला आहे. इराणातून आलेल्या आर्यांचा भारत देशाशी कसलाही संबंध नसताना ब्रह्म्या, परशुरामादिंनी क्षेत्रवाशीयांवर वारंवार हल्ले करुन त्यांना कैद केले. देशातील सर्व क्षेत्रीयांना जेरीस आणून देश नि:क्षेत्रिय बनविला. त्यांना कायम स्वरुपाचे गुलाम बनविले. अर्थात यामुळे यवन्यांचे साधले. याबाबत राजमाता शिवाजीस सांगतात,

क्षत्रिय केले जरजर, भये कोपे थरथर ।।
बहु केले देशापार, बाकी राही मांग-महार ।।
नि:क्षेत्री झाल्यावर म्लेंछे केले डोके वर ।। [९]

राजमातेनी सांगितलेला सर्व हृदयद्रावक वृत्तांत ऐकून शिवाजीस स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. शिवाजीराजेंनी तानाजी, बाजीप्रभु,येसाजी कंक व शेकडो मावळे, साथीदार जमवून स्वकीयांचा बचाव करण्याचे ठरविले. अनेक गड किल्ले काबीज केले.

जोतिरावांनी या पोवाडयात शिवचरित्रातील अनेक राजकीय घडामोडी समाविष्ट केल्या. विजापूरच्या दरबारातून पिताजींची सुटका, चंद्रराव मोरेंचा पाडाव, अफझलखान वध, सिध्दी जोहाराचा पन्हाळयास वेढा, शाहिस्तेखान स्वारी, पुरंदरचा तह, आग्रयाहून सुटका, शिवराज्याभिषेक, शिवाजीराज्यांचा प्रयाण प्रसंग या सर्व घटना काव्यबद्ध केल्या आहेत. जोतिरावांनी उपलब्ध असणा-या साधनसामुग्रीच्या आधारे शिवाजीराजेंच्या कार्याचे यथायोग्य मुल्यमापन केले आहे. पोवाडयांत स्थलकालाचा थोडासा विपर्यास झाला असेल, पण जोतिरावांनी घटनाक्रम शक्य तेवढया चौकस आणि चिकित्सक दृष्टीने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

पोवाडयातील आठव्या विभागात शिवाजीराजेंचा समजुतदारपणा वर्णिलेला आहे. स्वार्थी, दुराचारी व्यंकोजीस पत्र पाठवून त्यांना सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न राजेंनी केला. शिवाजीराजेंच्या बोधात्मक पत्रांचा व्यंकोजीवर झालेला परिणाम व्यक्त करताना फुले म्हणतात -

सुबोधाचे पत्र ऐकता शुध्दीवर आला ।
व्यंकोजी लागे कामाला ।। [१०]

यातून शिवाजीराजेंचे व्यवहारचातुर्य जाणवते. फुल्यांनी राजेंचा प्रयाणप्रसंग कारुण्यमयतेने व हळुवारपणे रेखाटला आहे. कुणापुढे कधीही न घाबरणारे धैर्यशील राजे रायगडावर "गुडगीरोगाला"घाबरले . या आजारातही त्यांनी सतत सहा दिवस जिवघेण्या यातना सहन केल्या, पण राजेपदाला कलंकित करणारे व्याकूळ रडगाणे बरळले नाहीत. अखेर काळालाही हुलकावणी देवून शिवाजीराजेंनी स्वर्गारोहण केले. राजेंच्या प्रयाणानंतर शोकाकूल जनतेने त्यांचे कर्तृत्व गुणगौरव गाऊन छत्रपतींचे असामान्यत्व सिध्द केले.

ऐतिहासिक घटना - आक्षेप :

जोतिराव फुले पोवाडयातून काही ऐतिहासिक घटनांचे खंडनमंडण करतात. शिवकार्यासंबंधीच्या काही रुढ कल्पनाबाबत फुले आक्षेप घेतात. "दादोजी कोंडदेव" शिवाजीराजेंचे बाळवयातील मार्गदर्शक होते. या ऐतिहासिक सत्याला जोतिराव कलाटणी देताना म्हणतात,

मासा पाणी खेळे गुरु कोण असे त्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ।। [११]

बालपणापासून मुर्दुमकी आणि मुत्सध्दीपणाच्या वातावरणात वाढलेल्या प्रज्ञावंत शिवाजीराजेंना राजकारणाचे धडे शिकविणे म्हणजे पाण्यात राहणा-या माशयांना पोहण्यास शिकविण्यासारखेच होईल. हे त्यांचे मत योग्यच होते. दादोजी कोंडदेवाने शिवाजीला मामुली ब्राह्मणी [illegible]

8230
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जास्त काही खास शिकविलेले नाही असे मत जोतिरावांना मांडावयाचे आहे. तसेच ज्या समर्थ रामदासांनी,

मराठा तितुका मेळवावा ।
महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।

असा उपदेश करुन शिवाजीराजेसह सर्व क्षत्रियांना प्रेरणा दिली त्या समर्थ रामदासांनी छ. शिवाजीराजेंचे नावलौकिक व कर्तृत्व जाणून त्यांना एक पत्र पाठविले. शिवाजीराजेंची थोरवी गाताना रामदास पत्रातून म्हणतात,

निश्चयाचा महामेरु । बहुतजनास आधारु ।।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ।। [१२]

रामदासांच्या मनी राजेंच्याबाबत आस्था होती. अर्थातच राजेंनी समर्थरामदासांची भेट घेण्याचे ठरविले. शिंगणवाडी येथे रामदासांची भेट घेऊन राजेनी अनुग्रहाबाबत विनंती केली व त्यांचे शिष्यत्व पत्करले. याबाबत जोतिराव म्हणतात -

लोकप्रितीकरिता गुरु करी रामदासास
राजगडी स्थापी देवीस ।। [१३]

केवळ लोकप्रितीकरिताच राजेंनी रामदासांचे शिष्यत्व स्वीकारले होते. असे जोतिराव मत मांडतात. जोतिरावांच्या मनात पुढे रामदासांबाबत आकस निर्माण झाला असावा. कारण " शिवराज्याभिषेकावेळी देशकाल वर्तमानाचा विचार करुन गागाभट्टांकडून राज्याभिषेक व्हावा हे समर्थ रामदासांनी सुचविले. "[१४] राज्याभिषेकसमयी रामदास प्रत्यक्ष हजर नव्हते. पण गागाभट्टानी खूप मोठी द्रव्यलूट केली. याप्रसंगी जमलेल्या पन्नासहजार ब्राह्मणांनी चार महिने मिष्टान्न व उलफाच्या स्माने खूप द्रव्य लुटले. या विधीसाठी एक करोड बेचाळीस लक्ष होन खर्च झाले. या गागाभट्टांच्या वैयक्तिक खर्चाबाबत "कृष्णाजी अनंत सभासद" म्हणतात, "गागाभट्ट मुख्य अध्वर्यु त्यास अपरिमित द्रव्य दिले. " ब्राह्म्यवृंदयांनी

घातलेल्या या खेळाबाबत जोतिराव म्हणतात,

काशिकर गंगाभट घाली डौल धर्माचा ।।
केला खेळ गारुड्यांचा ।। [१५]

ब्रह्म्यवृद्यांनी धर्माच्या नावाखाली व्यवहारचतुर, पराक्रमी शिवाजीराजेनाही दारुगोळ्यांच्या मदतीशिवाय येथेच्छ लुबाडले. धर्माच्या नावाखाली त्यांनाही नमते घ्यावयास लावले. ही जोतिरावांच्या अंत:करणातील खंत आहे.

जोतिराव फुल्यांनी पोवाडयात भाकडकथांना स्थान दिलेले नाही. शिवाजीराजेना भवानीदेवीचा साक्षात्कार होऊन मिळालेल्या " भवानी तलवारीची " कथा किंवा राजेना संकटकाळी भवानीमाता साक्षात दर्शन देऊन सहाय्यास धावत असे. आणि तपशिलवार मार्गदर्शन करीत असे वगैरे प्रकार पोवाडयात कुठे आढळत नाहीत. त्याचप्रमाणे राजे रामदासाकडे जाऊन अध्यात्मिक शांती व सल्लामसलत करीत असत. यासारखा सर्व बनावट भाग जोतिरावांना मान्य नाही. म्हणून त्यांनी पोवाडयात त्याचा समावेश ही केलेला नाही.

पोवाडयातील बोध -

जोतिरावांनी लिहिलेल्या "छ. शिवाजीराजे भोसले" या पोवाडयाचा उद्देश केवळ "शिवचरित्र कथा" समाजापुढे मांडणे हा नसून त्या चरित्रकथेच्या निमित्ताने आपले सामाजिक तत्वज्ञान बहुजन समाजासमोर मांडणे हाच होता. शिवकालापूर्वी देशात माजलेली अराजकता आणि उच्चवर्णीयांनी इतर जनांवर लादलेली गुलामगिरी यामुळे सर्वसामान्यांचे जिवनच विस्कळीत झाले होते. ब्रह्म्य-परशुरामादिं आर्यांच्या नेत्यांनी समाजात घातलेला नंगानाच व निष्पाप क्षेत्र-वाशीयांची केलेली कत्तल, ही सर्व अमानवी कृत्ये जोतिरावांनी राजमाता जिजाबाईच्या तोंडून बालशिवाजीस ऐकविली आहेत. स्वराज्य निर्मितीची नवप्रेरणा ज्याप्रमाणे छ. शिवाजीच्या मनात प्रखरतेने निर्माण झाली त्याप्रमाणे तत्कालीन ब्राह्मणी वर्चस्वाच्या गुलामगिरीमुळे हतबल झालेल्या क्षेत्रवाशीयांमध्ये

शिवाजीसारखा महापराक्रमी राजा निर्माण झाला. त्यांच्या कर्तृत्वामुळेच सर्वांना स्वातंत्र्य लाभले. अन्यत: उच्चवर्णीयांच्या कचाटयातून म्लेच्छांच्या गुलामगिरीत सर्व क्षत्रियांना लाचारीचे जीवन जगावे लागले असते. छत्रपतींचा आदर्श डोळ्यापुढे ठेवणे देशहितार्थच आहे. त्यांच्या मृत्यूनंतर राज्यकारभार सांभाळण्याऱ्या संभाजीराजेंना उपदेश करताना समर्थ रामदास आपल्या पत्रातून म्हणतात -

शिवरायांचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।
त्याहुनी करावे विशेष ।। तरीच म्हणावे पुरुष ।।
या उपरी आता विशेष । काय लिहावे ।। [१६]

यातूनच छत्रपतींच्या कर्तृत्वाचा बोध होतो. छत्रपती शिवाजीराजेंचे जीवन म्हणजे एक आदर्शनीय अभिजात कलाकृतीच होय. समाजातील शुद्रातिशुद्रांनी हा आदर्श डोळयासमोर ठेऊन मर्दमराठयाप्रमाणे स्वाभिमानाने जीवन जगावे ही उपदेशवाणी जोतिराव पोवाडयाद्वारे व्यक्त करतात.

"पोवाडा" या काव्यप्रकाराद्वारे आपण शुद्रातिशुद्रांमध्ये नवक्रांती निर्माण करु शकतो. असा जोतिरावांना आत्मविश्वास होता. म्हणूनच त्यांनी या काव्यप्रकारावर भर दिला. "दस्यू" समजल्या जाणाऱ्या शुद्रातिशुद्रांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी फुल्यांनी "दस्यूचा" पोवाडा लिहिला. "दस्यू" या शब्दाचा मूळचा अर्थ आक्रमक आर्यापासून दूर राहणारे अथवा त्यांच्याशी दुरावा ठेवणारे असा आहे. 'दस' या धातूचा अर्थ मार देवून दूर ढकलणे असा आहे. इराणातून आलेल्या आर्यांनी बलिस्थानातील प्रेमळ पण पराक्रमी क्षेत्रवासीयांना छळून हकालपट्टी केली, तर काहींना दास बनविले. या दस्यूंच्या अंत:करणालाच फुल्यांनी या पोवाडयाच्या माध्यमाने स्पर्श केला आहे. त्यांचे स्वत्व जागृत करण्यासाठी परखड टीकाही केली आहे. धारदार शब्दांच्या माऱ्यांनी लाचार जीवन जगणाऱ्या दस्यूंना झोडपून काढले आहे, ते म्हणतात -

१३

पायीचे पिता तीर्थ केली की शार्थ ख-या मर्दात ।।
छळती यवन दुराणी, शारम नाही काही मनात ।। [१७]

गुलामगिरीत सुस्तावलेल्या, झोपी गेलेल्या दस्यूंच्या दुबळया मनाला जागे करण्यासाठी फुले आटोकाट प्रयत्न करतात. जोतिरावांनी लिहिलेला दस्यूंचा पोवाडा शूद्रातिशूद्रासमोर स्वत्वाची जाणीव करुन देणारी प्रखर प्रेरणा धारण करुन अवतरतो. छ. शिवाजीचा पोवाडा दस्यूंचा पोवाडा याप्रमाणे जोतिरावांनी पोवाडयाच्या धरतीवर "ब्राह्मणाचे कसब" हा पद्यग्रंथ सन १८६९ मध्ये लिहिला. हा काव्यग्रंथ त्यांनी लोकहितार्थ रचला आहे, असा स्पष्ट उल्लेख ते काव्यग्रंथाच्या मुखपृष्ठावर करतात.

ब्राह्मणाचे कसब -

जोतिराव फुल्यांनी ब्राह्मणाच्या वर्णवर्चस्वाविरुध्द ऐतिहासिक संघर्ष केला. वर्णव्यवस्थेविरुध्द त्यांनी जन्मभर झगडा केला. पूर्वकर्मानुसार चालत आलेली जन्मजात उच्चनिचता जोतिरावांना मान्य नव्हती. उच्चवर्णीयांच्या सुव्यवस्थेसाठी केलेली समाजाची विषम-वर्णव्यवस्था जोतिरावांना मोडून काढावयाची होती. अर्थात या वर्णव्यवस्थेचे निर्माते "ब्राह्मणच" होते असा ठाम विश्वास फुल्यांचा होता. पण ब्राह्मणांनीच जातिसंस्था निर्माण केली हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पटले नाही. याबाबत आपले मत मांडताना डॉ. आंबेडकर म्हणतात -

ब्राह्मणांनी अनेक गुन्हे केले असतील. ही दुष्ट संस्था तशीच चालू ठेवण्यात ब्राह्मणांचा तर हात होताच पण ब्राह्मणेतरांवर जातिसंस्था स्वत: निर्माण करुन लादणे त्यांच्या ताकदीपलिकडचे होते.[१८] पण पुरोहितवर्गाने आपल्या बुध्दिकौशल्यावर धर्मग्रंथ निर्माण करुन सर्वसामान्य समाजावर आपले अधिपत्य लादले. उच्चवर्णीयांची ही गुलामगिरी सामान्यांच्या मनावर एवढी बिंबली होती की ते ही गुलामगिरी आणि वर्णव्यवस्था ईश्वरनिर्मित समजत असत. साधुसंतांचा सुध्दा या विषम-वर्णव्यवस्थेस विशेष विरोध नव्हता. उलट ते चातुर्वर्णाच्या चौकटीतच घुटमळत होते.

धर्माच्या नावाखाली समाजाची लुबाडणूक करणे हे उच्चवर्णीयांचे तत्वच होते. धर्म हा आत्याच श्रध्देचा प्रांत. त्याबाबतीत अत्यंत गरीब माणूस सुध्दा चालढकल करीत नाही. धर्मतत्वावर श्रध्दा विश्वास ठेऊन ते ब्राह्मणाच्या स्वार्थी जाळयात सापडतात. पुरोहितवर्गाने हजारो वर्षापासून चालविलेली, सामान्यांच्या रक्तातील कणा-कणांत बिंबविलेली आचारसंहिता आणि परंपरा जोतिरावांना समूळ उखडून काढावयाची होती. त्यासाठी जनजागृतीचे कार्य त्यांनी हाती घेतले. शूद्रातिशूद्रांचा आजपर्यंत चालविलेला अनन्वित छळ व अमानवी कृत्य फुलेंनी काव्यातून रेखाटली. धर्म, पूजाविधी, व्रत वैकल्याच्या निमित्ताने हा वर्ग कसा लुबाडणूक करतो हे त्यांचे कौशाल्य "ब्राह्मणाचे कसब" या काव्यग्रंथातून व्यक्त केले. या काव्यग्रंथामध्ये जोतिरावांनी पोवाडा व अभंग या दोन्ही काव्यप्रकाराचा अवलंब केला आहे. काव्यग्रंथाचे एकूण नऊ विभाग केले आहेत. यामध्ये तीन पोवाडे व सहा अभंगांचा समावेश होतो.

"ब्राह्मणाचे कसब" या काव्यग्रंथातील पोवाडयातून जोतिरावांनी इराणी आर्यभट्टांचे आक्रमण, वामनाने केलेली दगाबाजी, परशुरामाने केलेली क्रूर कत्तल इत्यादी बाबी वर्णिल्या आहेत. बळीराजांच्या राजवटीतील व्यवस्था, प्रशासन अनुकरणीय स्वरुपाची होते. बळीराजा ख-या अर्थाने प्रजापिता होता. त्यांच्या राज्यात सुख-समृध्दीस बहर आला होता. पण इराणातून आलेल्या आर्यांनी बलिस्थानात हैदोस घातला. सुख-समृध्दीची जागा हिंसाचार गुलामगिरीने घेतली. सर्वत्र अराजकता, लुटालुट, बेबंदशाहीचे वर्चस्व होते. आंग्लाईत "राज्य इंग्रजांचे" पण कारभार ब्राह्मणांचाच होता. इंग्रजांच्या नावावर वाट्टेल तो भ्रष्टाचार हा वर्ग करत होताच. शिवाय वेळ प्रसंगी आंग्लाईची कुचेष्टा, अवमूल्यन ते करीत होते. म्हणून जोतिराव इंग्रजराणीस म्हणतात -

धन्य राणीबाई ।। झाम कसी देई ।।
आहेस मोर्चाची धणीन खास ।।
सोडवी दीन-बंधूस ।। [१९]

जोतिरावांना इंग्रजी राजवटीची तत्वे, पसंद होती. इंग्रजांच्या आगमनामुळे समाजात सर्वसामान्यापर्यंत शिक्षण जाऊन पोहोचले. सर्वत्र समतेचे वारे पसरु लागले. जातिभेदास गौणस्थान देणा-या इंग्रजांनी ब्राह्मणाचे ब्रह्म्यकूट बाहेर पाडण्याचा प्रयत्न केला. अर्थातच यामुळे इंग्रजी राजवटीस सुरुंग लावण्याचा प्रयत्न कृतघ्न ब्राह्मण करु लागले. त्यांच्या या विश्वासघातकी वृत्तीबाबत जोतिराव इंग्रजांना खूपवेळा धोक्याचा इशारा देतात. त्यांच्या ब्राह्मणी काव्यास फुले अटकाव करण्याचा प्रयत्न करतात. उच्चवर्णीय प्रसंगपरत्वे " बामणी कावा " समाजास दाखवित होतेच. भट पोथी वाचण्याच्या निमित्ताने शुद्रातिशुद्रांच्या, शेतक-यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून येथेच्छ द्रव्यलूट करीत असे. गुढीपाडवा, एकादशी, आष्टमी, विजयादशमी, मकरसंक्रांत, तुलशीविवाह सारख्या प्रसंगी पुरोहितवर्ग आपली पर्वणी योग्यपणे साधतो. उच्चवर्णीयांनी बारा महिने चालू राहतील असे विविध धार्मिक विधी निर्माण केले होतेच. परंपरेनुसार हे धार्मिक विधी सर्वसामान्यांच्या घरी सुरु असतातच. त्यानिमित्ताने या ब्रह्म्यवृंदाना येथेच्छ भोजन व भरपूर दक्षिणा प्राप्त करुन घेण्यासाठी भट जोशी नेहमीच धडपडत असतात. त्यांची ही पर्वणी बारा महिने सुरु असतेच. पण त्या परंपरेस पायबंद घालण्याचे धैर्य कुणाकडेच कसे नाही याचे जोतिरावांना आश्चर्य वाटते.

कष्टविरहित जीवन जगणा-या पुरोहितवर्गाचे द्रव्यलूट करण्याचे अनेक मार्ग जोतिरावांनी समाजासमोर मांडले. अज्ञान, निरक्षर शेतक-यांचा गैरफायदा घेणारे किती तरी ब्राह्मण आढळतात. पूजाविधी, पोथी, वाचनादि निमित्ताने शुद्रातिशुद्रांच्या घरी शिरकाव करुन त्यांना विश्वासात घेऊन, शेतक-यांच्या संपत्तीवर, जमिनीवर त्यांचा डोळा असतोच. त्याला पैशाची गरज आहे हे दिसून येताच, उच्चवर्णीय त्यांना कर्जाऊ पैसे देऊन शेतक-यांच्या घरी भिक्षुकी करणारा भट सावकार बनतो. त्याची शेतीवाडी, घरदार, केवळ कर्ज व व्याजापोटी गिळंकृत करतो. त्यांच्या स्वार्थीवृत्तीला मर्यादा नसते.

एखाद्या घरातील कर्तापुरुष कालवश झाल्यास भटशाही स्वार्थीवृत्तीने तिकडे धाव घेते. शोकसागरात बुडालेल्या लोकांचा विचार न करता मृतात्म्यास

सद्‌गती मिळण्यासाठी स्वार्थीदृष्टीने उत्तरक्रियेसाठी त्यांना व्यर्थ खर्च करावयास लाउन स्वत: दक्षिणादि स्वरूपात खूप द्रव्यलूट करतात. याबाबत शूद्रातिशूद्रांना पोटतिडकीने उपदेश करताना जोतिराव म्हणतात -

धूर्त अट्टल । केला सट्टल ।।
भट्टाने शूद्रा ठकविले
ज्ञान सर्वांचे कसे खुंटले ।। [२०]

भट्ट-ब्राह्मणानी अखंडपणे चालविलेली लुबाडणूक कुणाच्याही लक्षात का येत नसावी ? सर्वांचेच ज्ञान, मती कशी खुंटली असा दु:खावेग जोतिराव व्यक्त करतात. अभंगरचनेद्वारा जोतिरावांनी ब्राह्मणाचे स्वार्थी, कष्टविरहित जीवन जगण्याबाबतचे बिंग फोडले आहे. पण चिं.ग.ओक यांना ब्राह्मणावरील "कष्टविरहित जीवन जगणे" हा आक्षेप मान्य नाही. याबाबत प्रतिहल्ला करताना ते म्हणतात -

शारीरिक कष्ट म्हणजेच कष्ट असे म्हणून त्यास मेहनताना पाहिजे. बौध्दिक कामात श्रम पडत नाहीत म्हणून तशी कामे करणारे ते फुकट खाऊ असे जोतिरावांचे मत आहे. मग वकील, डॉक्टर, शिक्षक, संशोधक, लेखक यांना मोबदला देण्याचे कारण नाही. कारण त्यांना श्रम असे काहीच होत नाहीत. असे त्यांचे मत दिसते. हे मत म्हणजे अज्ञानजन्य भ्रम आहे. निर्बुध्दालाच तो होतो.[२१] ब्राहमणवादी चि.ग.ओक सारख्या विद्वान विचारवंताने जोतिरावांच्या मताचा कुपमंडूक वृत्तीने काढलेला निष्कर्ष आणि जोतिरावांवर केलेला निर्बुध्दपणाचा शिक्कामोर्तब त्यांच्या विचारास व बुध्दीस विसंगत अशोभनीय वाटतो. त्यांच्या विचारशैलीत नि:पक्षपातीपणाचा अभाव दिसतो. वकील, डॉक्टर, शिक्षक संशोधकादि बुध्दिवादी लोकांचे बौध्दिक श्रम असतेच त्यांना त्यांच्या कर्तृत्वाप्रमाणे मोबदला मिळत असतोच. पण ब्राहमण समाजातील कितीतरी लोक पूजा-विधी-व्रत-वैकल्यादि रूपाने सामान्यसमाजातील धर्मांध लोकांच्या डोळयात धूळ फेकून श्रमविरहित ऐशाराममध्ये जीवन जगतात. त्यांची कष्टवरिहित जीवन जगण्याची कला अनेक उदाहरणांनी अभंगाद्वारे जोतिरावांनी दाखविली आहे.

जोतिरावांची अभंगरचना :

अभंग ही काव्यरचना अंत:करणातील ख-याखु-या भावचैतन्याच्या अविष्काराला अतिशय अनुरूप ठरते. या काव्यप्रकाराद्वारे उपदेश प्रचार, सामाजिक जाणीव, टीका सहज आणि प्रभावीपणे करता येते. रसिकांच्या हृदयाला थेट जोऊन भिडण्याचे सामर्थ्य "अभंग" या काव्यप्रकारात आढळते. या काव्यप्रकाराबाबत मधु कुलकर्णी म्हणतात –

" अभंगाच्या रूपानेच मराठी कवितेला ख-या अर्थाने आकृतिबंध घाट मिळाला. " [२२]

महाराष्ट्रातील संतांनी "अभंग" हा काव्यप्रकार चिरंजीव करून ठेवला. याबाबतचे विशेष श्रेय नामदेव, तुकारामांना द्यावे लागेल. ज्ञानेश्वरांनीही या काव्यप्रकाराचा अवलंब केला होता. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार इत्यादी संतांनी या काव्य प्रकारास बहर आणला. जोतिराव फुल्यांनी ही परंपरा टिकवून ठेवली. कृष्णराव भालेकरादि समाजसुधारकांनीही अभंगाच्या रूपाने समाजप्रबोधन केले.

जोतिरावांनी आपल्या काव्यरचनेत "अभंग" या काव्यप्रकाराचा समावेश प्रकर्षाने केला. अभंगरचनेतून ब्राह्मणांची स्वार्थीवृत्ती समाजासमोर मांडली. पुरोहितशाहीच्या लुटारूवृत्तीपासून सर्वसामान्य समाजाचा बचाव करण्याचा प्रयत्न जोतिरावांनी केला. "ब्राह्मणांचे कसब" या काव्यग्रंथामधील अभंगरचनेमध्ये उच्चवर्णीयांच्या कष्टविरहित ऐशारामी जीवन जगण्याच्या हरामीवृत्तीवर परखड टीका केली आहे. हे भू-देव अनेकवेळा शूद्रातिशूद्रांच्या घरी जाऊन मुलाच्या जन्मापासून ते ऋतुशांती, वास्तुशांती, ग्रहशांती, पूजाविधी, विवाहविधी एवढेच काय पण अंत्यविधी प्रसंगीही भूलथापा देऊन लुबाडतात. धर्माच्या नावाखाली चाललेल्या त्यांच्या या वृत्तीची जाणीव करून देण्यासाठी जोतिरावांनी अभंग रचना केली.

शूद्राघरी बालजन्म :

एखाद्या शूद्राच्या घरी बालकाचा जन्म झाल्याचे समजताच काही

काही भूदेव शूद्रांच्या घरी जाऊन मुलाची जन्मवेळ विचारून घेतात. राशीचक्र मांडून कपाळी आठ्या निर्माण करून व्यर्थ आकडेमोड करतात. त्यांच्या बनावट कृत्रिम हालचाली पाठीमागे स्वार्थी, लुटारूवृत्ती लपलेली असते. त्यांच्या या अवस्थेचे वर्णन करताना जोतिराव म्हणतात -

पुसे जन्मकाळ राशीचक्र मांडी ।।
चाळी बोटे कांडी वेडा जैसा ।।
न्याहळूनी सर्व भोळ्या पित्या बोले
मुळावरी आले बाळ तुझ्या ।। [२३]

निष्पाप निरागस बालकाबाबत भोंदू ब्राह्मणांची अपशकुनी काळजीभ बालकांच्या माता-पित्यांच्या मनात गैरसमज निर्माण करते. सर्व घरभर पसरलेले आनंदी वातावरण हळूहळू लोप पावते. पुत्र-उत्साहाच्या सुखसोहळ्याच्या आनंदावर पाणी ओतले जाते. सर्व घरामध्ये गांभिर्यपूर्ण चिंतातूर वातावरण-निर्मिती झाल्याची खात्री होताच पुरोहितवर्ग प्रसंगावधान साधून जप अनुष्टानाचा उपाय सुचवितात. हा उपाय म्हणजे त्या भोंदू ब्राह्मणाने भूलथापा देऊन साधलेली सुवर्णसंधी होय. जन्मलेल्या निष्पाप बालकाच्या ग्रहपिडा परिहाराच्या निमित्ताने जप अनुष्ठानादि विधीपूर्तीसाठी हा कोपिष्ट आणि पापिष्ट पुरोहितवर्ग शूद्रातिशूद्रांना कर्ज काढण्यास सांगून वेळप्रसंगी घरातील भांडीकुंडी विकण्यास प्रवृत्त करत असे. अशा भोंदू धर्मपंडितांना उपदेश करताना जोतिराव म्हणतात -

पोटे जाळू नका लोका फसवूनी ।।
देवा रागवूनी जोति म्हणे ।।

कष्टाशिवाय ऐशारामाचे जीवन जगणे हा जणू पुरोहितवर्गाचा मानदंडच असावा. जोतिराव फुलेंनी आपल्या अभंगाद्वारे भटलोकांचे शूद्रातिशूद्रांना लुबाडण्याचे अनेक मार्ग सांगितले आहेत. शूद्रांचा विवाहविधी म्हणजे भटशाहीची पर्वणीच असते.

विवाह-विधी -

विवाहासारख्या पवित्र विधीप्रसंगी जोशीबुवांचा विघ्नसंतोषीपणा स्वार्थासाठी सुरू असतोच. लग्नाबाबतच्या प्रारंभिक चर्चेवेळी सुध्दा हे भटलोक टपकतात. अर्थात शूद्रातिशूद्रांनी त्यांना ईश्वरतुल्य मानले. त्यांच्या परवानगीशिवाय पवित्र विधी संपन्न करणे म्हणजे आपत्ती, संकट ओढवून घेणे हा शूद्रातिशूद्रांच्या मनातील न्यूनगंड होय. त्यामुळे या भटशाहीचे चांगलेच साधले आहे. ते मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेतात व आपला धार्मिक आणि आध्यात्मिक दबाव कायम स्वरूपाचा ठेवतात. विवाहासंदर्भात मागणीच्यावेळी गुरूबळ, राशीबळ, गण, जातकादि जोतिषी तत्वान सांगून जर विवाहात अडसर येत असल्याने होमवहन करून ग्रहशांती केली जाते. विवाह निश्चित झाल्याबाबतचा लेखी स्वरूपातील पुरावा म्हणून उपस्थित लोकांच्या समवेत लग्नयादी लिहिण्याचे कामही ओघानेच भटजीबुवाकडे येते. यावेळी सुध्दा हे बुवामहाराज सभ्यपणाचा पेहराव परिधान करून द्रव्यलूट करतो. वधू आणि वरपक्ष दोन्हीकडे त्याची धाव असते. दोघांकडूनही तो विधीसंपन्न होईपर्यंत अखंडपणे लूट करतो. हाती अंतरपाट धरून एकदाचे घाई-गडबडीत शुभमंगल करून दक्षिणा, मांडवखंडणी घेण्यास सज्ज होतो. अशा भोंदूभटाची हकालपट्टी करून या विधीच्या संपन्नतेसाठी उपदेश करताना जोतीराव म्हणतात -

वर्ण, वय, गुण, प्रित परस्पर ।।
पहा सारासार तपासूनी ।।
देवा प्रार्थुनिया घालावी माळ ।।
मेळवूनी मेळ आनंदाचा ।।

विवाहविधीसारख्या पवित्र प्रसंगी लुडबुड करणा-या दलाली भटाची जोतिराव हकालपट्टी करण्याचा उपदेश सर्वसामान्य जनतेस करतात. पण अद्यापही धर्मांध जनता दलालीवृत्तीच्या भटांच्या कर्तृत्वास पवित्रकार्य समजून पुरोहितशाहीच्या अविचारी वृत्तीस खतपाणी घालतात. विवाहविधी प्रमाणे वास्तुशांतीवेळी सुध्दा त्यांचाच पुढाकार असतो.

१४

वास्तुशांती -

शूद्रातिशूद्र पिढयानपिढया दारिद्रयाशी झगडताना आढळतात. अन्न, वस्त्र, निवारा या तीन मुलभूत मानवी गरजाही ते भागवू शकत नाहीत. ते अहोरात्र काबाडकष्ट करुन कसाबसा उदरनिर्वाह चालवित असतात. निवा-यासाठी एखादं छोटसं घर जरी बांधावयाचे असेल तर त्यांना आयुष्यभर कष्टापासून शक्य तेवढी काटकसर करावी लागते. आयुष्याच्या काबाडकष्टाचेफलीत एका वास्तूच्या रुपात त्यांना मिळत असते. या वास्तूच्या उभारणीसाठी शूद्रातिशूद्रच वेठबिगारी, गवंडीकाम, सुतार काम करीत असतात. घर बांधणीसाठी झटणा-या शूद्रातिशूद्र कामगारांच्या शरीरातून अक्षरश: घामाचे पाझर फुटत असतात. घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कामगारांच्या समाधानासाठी घरमालक स्वईच्छेने त्यांना भोजनाचे अभिवाचन देतात. शुभवेळी नवीन वास्तूमध्ये राहण्यास जावे असा विचार घरमालकाच्या मनी असतो. पंचांगाधारे शुभवेळ पाहण्यासाठी भटाकडे घरमालक जातो. येथेच त्याची फसगत होते. या संधीचा स्वार्थी भट मनसोक्त फायदा घेतो. वास्तुशांतीच्या निमित्ताने तो नवीन बांधलेल्या घरात शिरकाव करतो. होम-हवन, ग्रहशांती करुन ब्राहमणभोजन होते पण अहोरात्र कष्ट केलेल्या कामगारांना ब्राहमणासमवेत भोजन करणेस परवानगी सुध्दा नसते. उरले-सुरले खाऊन घरमालक व कामगार समाधान मानतात.

वास्तूशांतीचे स्तोम माजविणारे ब्राहमण जाते वेळेस घरमालकाकडून "दक्षिणा" उपटतात. त्यांची ही स्वार्थीवृत्ती आणि उद्योगाशिवाय ऐशारामात जीवन जगण्याची पध्दती त्यांना लाजविणारी का वाटत नाही ? अशी जोतिरावांना विवंचना लागून राहिली होती. त्यांनी हे लाजिरवाणे जीवन जगण्याची पध्दती बंद करुन स्वकष्टाने पोट भरण्याबाबतचा उपदेश जोतिरावांनी केला. पण अद्यापही उच्चवर्णीयांची कष्टविरहित जीवन जगण्याची परंपरा थोडयाफार प्रमाणात आढळते. अज्ञानी शूद्रातिशूद्र आजही उच्चवर्णीयांना पूजाविधीसाठी घरी बोलावून स्वत:च संधी उपलब्ध करुन देण्याचा शहाणपणा करतात.

ब्राह्मणी ठकबाजी -

पुरोहितवर्ग आपली स्वार्थी व लोभीवृत्ती तृप्त करण्यासाठी विविध मार्गाने शूद्रातिशूद्रांवर ठकबाजी करतो. विवाहविधी, वास्तुशांती, अंत्यविधी, ग्रंथपठण, ऋतु-शांती याशिवाय सणवार, सूर्यचंद्रादिग्रहण-प्रसंगाच्या निमित्ताने भट शूद्रातिशूद्रांना लुबाडण्यासाठी शिरकाव करतो. ब्राह्मणांची समाजात सभ्यपणे चाललेली ही ठकबाजीच होय. सामान्य अज्ञानी लोक या ठकबाजीस बळी पडतात. भाद्रपद महिना म्हणजे शेतक-यांना वर्षासनाच्या निमित्ताने लुबाडण्याची सुवर्णसंधीच होय. याबाबत जोतिराव म्हणतात -

वसुलीचा थाट भाद्रपद मासी ॥
सोडीना पुत्रासी जन्मभर ॥
संक्रांती पाडवा भोके सर्व सणी ॥
लाज नाही मनी वाटोळयाच्या ॥ [२४]

वर्षासनाच्या वसुलीसाठी एखादया भिकमाग्याप्रमाणे गल्लोगल्लीत फिरण्यामध्ये त्यांना कसलीही शरम वाटत नाही. शिवाय सूर्यचंद्रादि ग्रहांचे दुष्परिणाम अज्ञानी शूद्रांना सांगून त्यापासून सावध राहणेचा इशारा देऊन द्रव्यलूट करतात. वास्तविक चंद्रादिग्रहण ही एक भौगोलिक घटना आहे. या घटनेशी मानवी जीवनाचा कसलाही संबंध नसतो. पण विनाकारण याबाबतचे स्तोम माजवून शूद्रांना लुबाडण्याची ते संधी उपलब्ध करून घेतात. तीर्थयात्रेवेळी एखादया बगळयाप्रमाणे प्रसंगावधान साधून भटलोक यात्रेकरूंना लुबाडतात. शूद्रातिशूद्रांना लुबाडण्याचे उच्चवर्णीयांचे अनेक मार्ग आहेत. त्यांच्या या स्वभावधर्माबाबत फुले म्हणतात -

द्वाड खोडकर स्वभाव देहाचा ॥
जाईना मुळीच वज्रलेप ॥

आयुष्यभर शूद्रांना लुबाडून त्यांच्या घरी भोजनावर येथेच्छ ताव मारून ऐशारामात जीवन जगणा-या ब्राह्मणाने शूद्रांना अस्पृश्य समजून अमानवी वर्तन दिले. शूद्रांना

झालेला स्पर्श विटाळ समजण्यात आला. त्यांचे मानवी हक्क हिरावून घेण्यात आले. विद्येपासून त्यांना वंचित ठेवले. शुद्रांना कायम स्वरूपाचे दास बनविले. शुद्रातिशुद्रांची मानवी प्रतिष्ठा रसातळाला घालविली. शुद्रांच्या या दैन्यावस्थेबाबत जोतिराव म्हणतात -

विद्याहीन शुद्र लज्जाहीन झाला ।।
जोडा सांभाळीला ब्राह्मणांचा ।।
हातातील जोडे मधी टाकू नका ।।
शोध करा निका जोती म्हणे ।। [२५]

भटशाहीच्या कर्तृत्वाचा शोध घेऊन त्यांच्यापासून सावध राहण्याचा इशारा जोतिराव शुद्रातिशुद्रांना देतात. ज्या विवाहविधीच्या निमित्ताने पुरोहितवर्ग सर्वसामान्यांची लूट करतो त्यांचे पौराहित्यच मान्य करू नये असा पर्याय जोतिराव सुचवितात. भट ब्राह्मणाऐवजी एखाद्या शुद्राच्या साक्षीने विवाहासारखे विधी संपन्न व्हावेत अशी जोतिरावांची अपेक्षा होती. म्हणून त्यांनी " सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी " ही पुस्तिका प्रकाशित केली. विवाहविधीतील मंगलाष्टके व शपथा संस्कृताऐवजी मराठीत असावीत म्हणजे वधू-वरांना त्या कळू शकतील इत्यादी विचार जोतिराव या पुस्तिकेद्वारे सांगतात.

## मंगलाष्टके - आरत्या :

भट-ब्राह्मणाऐवजी जातीपर्थांच्या साक्षीने विवाहविधी संपन्न करून पुरोहितशाहीच्या ठकबाजीस जोतिरावांनी शह देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सत्यशोधक समाजोक्त विवाहविधी तयार केला. विवाहविधी संपन्न होईपर्यंत धूर्त कपटी आर्यभटाची या कामी सावली देखील पडू देऊ नये असे जोतिराव आपल्या जातबांधवांना निक्षून सांगतात. यासाठी आवश्यक असणारी मंगलाष्टके सर्व-सामान्यांना समजतील अशा सोप्या मराठी भाषेत तयार करण्यात आली. या मंगलाष्टकातून 'वर' आणि 'वधू' एकमेकांना आपल्या भावी वैवाहिक जीवनाबाबत अभिवचने देतात. ऐकमेकांच्या घराण्याचे आणि कर्तृत्वाचे कौतुक करतात. या

अर्थपूर्ण मंगलाष्टकातूनच एकमेकांबाबत व आप्तस्वकीयाबाबत प्रेमभाव निर्माण होतो. आपल्या धर्मपत्नीची स्तुती करताना स्वत: नवरा मुलगा मंगलाष्टकातूनच म्हणतो -

प्रीतिने वरितो तुला अजि तुझी
ऐकून कीर्ति अशी
शुभमंगल सावधान ।।

नवऱ्यामूलाने मंगलाष्टकातून नववधूची स्तुती गायिल्यानंतर आपल्या सत्याचरणाबाबत अभिवचन देताना सर्व जातपंथियांच्या समक्ष म्हणतो,

मानीतो सकला स्त्रियास बहिणी,
तू एकली मत्प्रीया ।।
कत्यचि भय मी मनांत तुजला,
ठेवीन पोसावया ।।
शुभ-मंगल सावधान .

आपल्या जीवनसाथीदाराने दिलेल्या अभिवचनास प्रत्युत्तर म्हणून नववधूही मंगलाष्टकातून शुध्दचारित्र्याबाबतचे अभिवचन देते. वास्तविक ही मंगलाष्टके स्वत: 'नववधू' व 'वर' यांनीच म्हणावयाची आहेत. पण जर ते अशिक्षित असतील तर वाक्यरचनेत योग्य तो बदल करुन विवाहसोहळयातील एखादया व्यक्तिने म्हणावीत अशी जोतिरावांनी सूचना केली आहे. अशिक्षित नववधूवर यांच्या बाबतीत ही मंगलाष्टके थोडयाप्रमाणात गैरसोईची वाटतात. मंगलाष्टके व पुष्पहार अर्पण केल्यानंतर पुष्पवृष्टी होते. लगेचे निर्मिक व कुलस्वामीच्या स्मरणार्थ पूजाविधी होतो व वधूवर एकमेकांशी एकनिष्ट राहण्याबाबत जातपंथा समक्ष प्रतिज्ञा करतात. इष्टमित्रांसाठी विवाहसंपन्नतेच्या आनंदाप्रित्यर्थ "सहभोजन" आयोजित करतात. याप्रमाणे सर्वसामान्यांना अर्थबोध होईल अशा शब्दरचनेचा मंगलाष्टकामध्ये अवलंब करुन विवाहविधी संपन्न करतात. याप्रमाणे ब्राहमणपुरोहिताशिवाय वास्तूशांती, अंत्यविधी, पूजाविधी संपन्न करण्यासाठी जोतिरावांनी "सत्यशोधक समाजोक्त पूजाविधी" या पुस्तकातून तंत्र सांगितले आहे. लोककल्याणार्थ त्यांनी या पुस्तिकेच्या २००० प्रती छापल्या असल्याचा उल्लेख पुस्तिकेच्या प्रारंभीच करतात.

जोतिरावांनी काही आरत्या लिहून आपल्या अंत:करणातील तळमळ ईश्वरास सांगितली आहे. आदिसत्याच्या आरतीद्वारा ब्राहमणांनी चालविलेला अधर्म, अत्याचार जोतिरावांनी सर्वसामान्य जनतेसमोर मांडला आहे. या ब्रहमवृंदांना कष्ट करून जीवन जगण्याची सद्बुध्दी दे अशी विनवणी जोतिराव आदिसत्याजवळ करतात. आरत्यांच्या माध्यमाने ईश्वरास जागे करण्याचा प्रयत्न जोतिरावांनी केला तर काव्याचा अवलंब करून सर्वसामान्य जनतेला जागृत केले. त्यांच्या काव्यामध्ये अभंगाप्रमाणेच "अखंड" रचनेचा प्रामुख्याने समावेश होतो.

## स मा रो प -

भागवतपंथीय संतानी अभंग रचनेचा अवलंब करून जातीसंस्थेचा निषेध केला. समाजातील भोंदुगिरीवर परखड टीका केली. सर्वसामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडण्याचे सामर्थ्य संतांच्या भाषाशैलीत होते. जोतिरावांना शूद्रातिशूद्रांच्या जागृतीसाठी अभंगासारखीच साधीसोपी काव्यरचना तयार करावयाची होती. अभंगास साधर्म्यदर्शक "अखंड" रचना करून जोतिरावांनी समाजासाठी अत्याधुनिक व न्याय आचार संहितेची अमोल देणगी दिली. त्यातील विषयवैविध्याचा व तत्वप्रणालीचा विचार पुढील प्रकरणात विस्ताराने करण्याचा प्रयत्न करू.

...

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १ | डॉ.तु.द.जोशी | <u>शोध समर्थांचा</u><br>आ.–, मुंबई-१, पृ.७९ |
| २ | डॉ.के.ना.वाटवे(संपा.)<br>डॉ.सौ.कुसुम कुलकर्णी | <u>पंडितीकाव्य,</u><br>आ.१, पुणे-२, १९६८, पृ.०३. |
| ३ | ग.बा.सरदार | <u>म.फुले : व्यक्ती आणि विचार</u><br>आ. १, मुंबई-२४, १९८१, पृ.८१ |
| ४ | वि.ल.भावे | <u>महाराष्ट्र सारस्वत खंड-२,</u><br>आ.६ ., मुंबई ३४, पृ.९९१ |
| ५ | डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर (संपादक) | <u>म.फुले : समग्र वाङ्मय</u><br>आ.१, मुंबई-३२, १९६९, पृ.७ |
| ६ | गं.बा.सरदार | उनि पृ.८१ |
| ७ | डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर (संपा.) | उनि पृ.०९ |
| ८ | गं.बा.सरदार | उनि.पृ.८१ |
| ९ | डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर (संपा.) | उनि पृ.१३ |
| १० | तत्रैव – पृ.३६ | |
| ११ | तत्रैव – पृ.१५ | |
| १२ | पुरुषोत्तम पा.गोखले | <u>श्रीराम समर्थ</u><br>आ.१, सातारा, १९७३, पृ.३२ |
| १३ | डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर (संपा.) | उनि पृ.२१ |
| १४ | पुरुषोत्तम पा.गोखले | उनि, पृ.१६७ |

| | |
|---|---|
| १५ डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर (संपा.) | उनि पृ.३४ |
| १६ पुरुषोत्तम पा.गोखले | उनि पृ.९६८ |
| १७ डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर(संपा.) | उनि पृ.४८८ |
| १८ मधु लिमये | <u>डॉ.बाबासो आंबेडकर एक चिंतन</u><br>आ. —, मुंबई १६,पृ.१५ |
| १९ डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर(संपा.) | उनि पृ.४८ |
| २० तत्रैव – पृ.६१ | |
| २१ श्री चिं.ग.ओक | <u>जोतिबा फुले कार्य व वाङ्मय यांचे सत्यस्वरुप दर्शन</u><br>आ.१, पुणे ३०, १९८४,पृ.०५ |
| २२ डॉ.मधु कुलकर्णी | <u>ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडण घडण,</u><br>आ.१,पुणे-५, १९८७,पृ.१०५ |
| २३ डॉ.स.ग.मालशे<br>धनंजय कीर(संपा.) | उनि पृ.४९ |
| २४ तत्रैव – पृ.६३ | |
| २५ तत्रैव – पृ.६४ | |

..